# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **प्रवीण सखाराम लोंढे** यांनी शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी सादर केलेल्या ***अर्जुन डांगळे यांचे निवडक साहित्य*** या लघुप्रबंधासाठी सर्व संशोधन माझ्या पर्यवेक्षणाखाली केलेले आहे.

**प्रवीण सखाराम लोंढे** यांनी हा लघुप्रबंध स्वतंत्र रीतीने लिहिला असून, तो इतर कोणत्याही विद्यापीठातील, कुठल्याही अन्य पदवी, पदविका अगर तत्सम विद्यापीठ परीक्षा समितीपुढे याच शीर्षकाखाली सादर केलेला नाही.

सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विषयातील एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : 19-05-2012

[signature]
मार्गदर्शक
(डॉ.रणधीर शिंदे)
अधिव्याख्याता,
मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, ***अर्जुन डांगळे यांचे निवडक साहित्य*** हा लघुप्रबंध मी स्वतः लिहिलेला असून, यापूर्वी तो अन्य कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही. प्रस्तुत प्रबंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. मराठी पदवीसाठी प्रथमच सादर करीत आहे.

अभ्यासक

(प्रवीण सखाराम लोंढे)

# ऋणनिर्देश

*अर्जुन डांगळे यांचे निवडक साहित्य* या विषयावरील एम.फिल (मराठी) पदवीसाठी लघुप्रबंध सादर करताना मला आनंद होतो आहे. या संशोधनकार्यासाठी ज्यांनी मला मोलाचे सहकार्य केले त्या सर्वांच्या प्रती ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

माझ्या संशोधन कार्याचे मार्गदर्शक शिवाजी विद्यापीठातील सहायक प्राध्यापक डॉ.रणधीर शिंदे सर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांची वाङ्मयीन जाण आणि अभ्यासाची शिस्त एकूणच माझ्या संशोधनकार्यास दिशा देणारी आणि वाङ्मयीन जाणीव विकसित करण्यास उपयुक्त ठरली. तसेच मराठी विभागातील विभागप्रमुख डॉ.रवींद्र ठाकूर, डॉ.विश्वनाथ शिंदे, डॉ.कृष्णा किरवले आणि डॉ.हिमांशू स्मार्त यांचेही वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन माझी संशोधन दृष्टी समृद्ध करण्यास उपकारक ठरले.

तसेच अर्जुन डांगळे यांनी माझ्या संशोधन कार्यासाठी आवश्यक ते संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले. त्याचबरोबर वेळोवेळी आपला अनमोल वेळ देऊन माझे संशोधन कार्य अधिक चांगले होण्यास मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मला महत्त्वाचे वाटते.

माझ्या संशोधन कार्यासाठी प्रोत्साहन व बळ देणारे आणि ज्यांच्या प्रेरणेशिवाय हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला नसता अशा प्रेमस्वरूप आईवडिलांच्या ऋणातून मला आयुष्यभर उतराई होता येणार नाही. त्याचप्रमाणे भाऊ अरविंद, बहिण सुनीता, अनिता, भाऊजी शहाजी पवार, माझी आजी आणि नेहमी मित्रवत नात्याने वागवणारे माझे मामा दिनेश, सुभाष आणि मामी पुष्पा यांनी माझ्या संशोधन कार्यासाठी दिलेले प्रोत्साहन अनमोल आहे.

माझे सन्मित्र नामदेव गपाटे, सीमा मुसळे, प्रा.रमेश शिंदे, प्रा.दत्ता घोलप, चंद्रभागा चोखा, गजानन अपिने, प्रा.सारीपुत्र तुपीरे, अरुण कोळी, राहूल कांबळे, योगेश चव्हाण, श्रुती कुलकर्णी, बापूसो पाटील तसेच मराठी विभागातील सर्व संशोधक विद्यार्थी यांचा आवर्जून उल्लेख करताना मला खूप आनंद होत आहे.

मराठी विभागातील कर्मचारी वनिता शिगावकर व मीनाक्षी स्वामी, सांख्यिकी विभागातील माझे स्नेही रामदास नागलबोने, नितीन लोहार, सुनीता शिंदे, अलका पाटील,

सुनीता वांगीकर व नाळे मॅडम तसेच पी.जी.बिल्स मधील कमलाकर जाधव यांच्या सहकार्याबद्दल आभार.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व कर्मचारी यांनी संशोधन सामग्री, आवश्यक ती पुस्तके वेळोवेळी उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळालेल्या राजीव गांधी राष्ट्रीय शिष्यवृत्तीच्या आर्थिक मदतीमुळे मी माझे संशोधनकार्य वेळेत पूर्ण करु शकलो त्याबद्दल त्यांचेही आभार.

माझ्या संपूर्ण संशोधन कार्यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : 19-05-2012

प्रवीण सखाराम लोंढे

# अनुक्रमणिका


उपोद्घात

प्रकरण पहिले

अर्जुन डांगळे यांची वाङ्मयीन जडणघडण पृ.१-१२

प्रकरण दुसरे

अर्जुन डांगळे यांची कविता पृ.१३-४८

प्रकरण तिसरे

अर्जुन डांगळे यांची कथा पृ.४९-८६

प्रकरण चौथे

अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मय पृ.८७-१०४

प्रकरण पाचवे

उपसंहार पृ.१०५-१०९

**परिशिष्टे**

अ. साधनग्रंथसूची पृ.११०

ब. संदर्भग्रंथसूची पृ.११०-१११

क. व्यक्तिगत माहिती पृ.११२-११३

# उपोद्घात

# उपोद्घात

१९७० च्या काळातील अर्जुन डांगळे हे एक महत्त्वाचे लेखक, कवी व समीक्षक होत. *त्यांचा छावणी हलते आहे* (कवितासंग्रह) *ही बांधावरची माणसं* (कथासंग्रह) या दोन महत्त्वाच्या साहित्यकृती होत. ललित लेखनाबरोबरच त्यांनी वैचारिक व समीक्षात्मक स्वरूपाचेही लेखन केले आहे. एम.ए.ला असताना अर्जुन डांगळे यांच्या या साहित्याचे वाचन केले होते. त्यावेळी डांगळे यांचे साहित्य सामाजिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्वाचे वाटले होते. गेल्या चारेक दशकातील महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय विशेषतः दलित विचारविश्वाचे प्रतिबिंब डांगळे यांच्या साहित्यात आहे. तसेच त्यांच्या ललित लेखनातून गेल्या चार दशकातील आंबेडकरी चळवळीच्या विचाराविश्वाचा व समाजभानाचाही आविष्कार झाला आहे. तर दलित साहित्याच्या स्थितीगतीचा व विकासक्रमाचा आलेख त्यांच्या वैचारिक स्वरूपाच्या लेखनातून व्यक्त झाला आहे. मराठी साहित्यातील या त्यांच्या महत्त्वपूर्ण कामगिरीचा अभ्यास करावा या हेतूने प्रस्तुत विषयाची निवड केली होती. *अर्जुन डांगळे यांचे साहित्य* असा विषय निश्चित केला होता. मात्र एम.फिल विषय छाननी समितीने *अर्जुन डांगळे यांचे निवडक साहित्य* असा शीर्षकात बदल सूचविण्यात आला. शीर्षकामध्ये *निवडक* असे जरी म्हटले असले तर प्रस्तुत अभ्यासात अर्जुन डांगळे यांच्या समग्र साहित्याचा विचार केला आहे.

प्रस्तुत अभ्यास हा लेखकाभ्यास या वर्गात समाविष्ट होतो. एका विशिष्ट कालखंडातील लेखकाच्या वाङ्मयीन कामगिरीचा सर्वांगीण अभ्यास या अभ्यास या लघुप्रबंधात मांडला आहे. याअभ्यासाची विभागणी एकूण पाच प्रकरणात केली आहे. त्यामध्ये प्रकरण पहिले अर्जुन डांगळे यांची वाङ्मयीन जडणघडण, दुसरे प्रकरण अर्जुन डांगळे यांची कविता, तिसरे अर्जुन डांगळे यांची कथा आणि चौथ्या प्रकरणात अर्जुन डांगळे यांचे वैचारिक वाङ्मयाचा विचार मांडला आहे. पाचवे उपसंहार हे प्रकरण केले आहे. या प्रकरणामध्ये प्रबंधांतीचे सार, निष्कर्ष संक्षेपाने नोंदविले आहेत. अर्जुन डांगळे यांच्या लेखनातील बहुविधपणाचा, सामर्थ्याचा एकत्र स्वरूपाचा विचार वरील प्रकरणांतून केला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधामध्ये संदर्भग्रंथांचा प्रकरणांती निर्देश न करता *हारवर्ड* पद्धतीचा वापर केला आहे. प्रबंधाच्या शेवटी एकत्रित स्वरुपात आकारविल्हेप्रमाणे संदर्भसूची दिली आहे. परिशिष्टात अर्जुन डांगळे यांची व्यक्तिगत स्वरूपाची माहिती दिली आहे.